# मिरा भाईंदर महानगरपालिका

जाक्र.मनपा/साप्र/४६६/2025-26

दि.27/10/2025

## परिपत्रक

मिरा भाईंदर महानगरपालिका, "ड" वर्ग स्थानिक स्वराज्य संस्था असुन महानगरपालिकेमार्फत नागरिकांना विविध मुलभुत व इतर सोई सुविधा पुरविल्या जातात. यामध्ये दैनंदिन अत्यावश्यक सेवा उदा. पाणीपुरवठा, आरोग्य, वैद्यकीय आरोग्य विभाग, परिवहन विभाग यांचा समावेश होत आहे. सदरच्या सेवा मनपाच्या स्थायी/अस्थायी/कंत्राटी अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून पुरविल्या जातात.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विभागांमार्फत अत्यावश्यक सेवा पुरविणाऱ्या कर्मचाऱ्याकडुन त्यांच्या मागण्या मान्य करण्याकरीता अचानक काम बंद आंदोलन केले जाते. सदर काम बंद आंदोलनामुळे महानगरपालिकेची सेवा काही काळाकरीता खंडीत होउुन दैनंदिन सेवेकरीता महानगरपालिकेवर अवलंबुन असलेल्या नागरिकांची प्रचंड गैरसोय होते. त्याचा फायदा घेऊन सदर कर्मचाऱ्यांकडून प्रशासनास वेठीस धरले जाते.

महाराष्ट्रातील नागरिकांना दैनंदिन आवश्यक सेवा पुरविण्याची जबाबदारी निश्चित करणेकरीता तसेच सदर सेवांतर्गत काम करणाऱ्या कर्मचारी यांनी संप अथवा नागरिकांची गैरसोय होईल अशा प्रकारचे वर्तन केल्यास करावयाच्या कारवाईबाबत "महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षक अधिनियम" (MESMA) या कायद्यामध्ये तरतुदी करण्यात आलेल्या आहेत.

तरी यापुढे मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विभागांमार्फत अत्यावश्यक सेवा पुरविणाऱ्या कोणत्याही अधिकारी/कर्मचारी यांनी काम बंद करून आंदोलन केल्यास व अत्यावश्यक सेवा खंडित केल्यास "महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षक अधिनियम" (MESMA) या कायद्याअंतर्गत संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**राधाबिनोद अ. शर्मा, भा.प्र.से.**
**आयुक्त तथा प्रशासक**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रति,**

1) अति. आयुक्त 1 व 2
2) उपायुक्त (मु)
3) सर्व उप-आयुक्त
4) परिवहन व्यवस्थापक, परिवहन विभाग
5) सर्व विभाग प्रमुख व सहा. आयुक्त, प्रभाग क्र. 1 ते 6